# प्रेस नोट

दिनांक:— २१/०१/२०२०

फिर्यादी यांना खाद्य विक्रिसाठी आवश्यक असलेला परवाना अनुकुल अहवालाव्दारे देण्याकरीता फिर्यादी यांचेकडे लोकसेवक यांनी रू. १,५०,०००/— लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्र. | ०४/२०२० |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | परेश चंद्रकांत कोरगांवकर, वय ५६ वर्षे, पद– नोकरी (सॅनिटरी इन्सपेक्टर) आरोग्य विभाग, पी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड (पश्चिम), मुंबई. |
| तडजोडी अंती मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १,५०,०००/— |
| स्विकारलेलेली लाचेची रक्कम | रू. १,५०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे भुमी मार्ट नावाचे ग्रोसरी शॉप आहे. नमूद ठिकाणी ते तयार खाद्य पदार्थांची देखील विक्रि करतात. खाद्य पदार्थ विक्रिसाठी त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित वॉर्ड कार्यालयाकडुन परवाना मिळविणे आवश्यक होते. त्याकरीता फिर्यादी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड येथे परवाना मिळण्यासाठी अर्ज केला होता. नमुद अर्ज पुढील कार्यवाहीकरीता लोकसेवक यांच्याकडे आल्याचे लोकसेवक यांनी सांगितले व अनुकुल अहवालाव्दारे लायसन्स देण्याकरीता फिर्यादी यांचेकडे तडजोडी अंती रु. १,५०,०००/— इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि., मुंबई विभाग यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी रु. १,५०,०००/— लाचेच्या रकमेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केल्याने सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाई दरम्यान आज दि. २०/०१/२०२० रोजी लोकसेवक यांना फिर्यादीच्या भुमी मार्ट या दुकानात फिर्यादी यांचेकडून रु. १,५०,०००/— लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई– ४०० ०३०.
संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in
ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net
टोल फ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक –९९३०९९७७००

( [illegible] )
अपर पोलीस उप आयुक्त (१)
ला.प्र.वि., मुंबई विभाग.

Scanned with CamScanner